# साय-फाय करंडक स्पर्धा डिसेंबरमध्ये

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सायबर सुरक्षेसंदर्भात जनजागृती करण्यासाठी पुणे पोलिस तसेच क्विक हिल सोल्युशन्स यांच्यातर्फे साय-फाय करंडक या एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यभरात विविध केंद्रांवर झालेल्या निवड प्रक्रियेतून २८ संघांची निवड करण्यात आली असून २१ ते २५ डिसेंबर या कालावधीत भरत नाट्य मंदिर येथे ही स्पर्धा रंगणार आहे. सायबर सुरक्षेसंदर्भातील विविध विषयांवर भाष्य करणाऱ्या एकांकिका या स्पर्धेत सादर केल्या जाणार आहेत. ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन माध्यमांद्वारे ही स्पर्धा घेण्यात येणार आहे.

शहरामध्ये गेल्या दोन वर्षांमध्ये सायबर गुन्ह्यांची मोठ्याप्रमाणावर वाढ झाली असून नागरिकांची फसवणूक केली जात आहे. ही फसवणूक टाळण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यातूनच या स्पर्धेची संकल्पना पुढे आली असून पुणे पोलिसांच्या सहकार्याने डिसेंबरमध्ये ही स्पर्धा पार पडणार आहे, अशी माहिती सायबर गुन्हे विभागाचे पोलिस उपायुक्त मिलिंद पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. क्विकहीलचे कैलास काटकर आणि स्पर्धेचे संयोजक प्रदीप वैद्य या वेळी उपस्थित होते.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संघांना दर्जेदार संहिता तयार करता यावी यासाठी पुणे पोलिसांमार्फत सायबर गुन्ह्याच्या घडलेल्या सत्यघटनांची माहिती देण्यात येणार आहे. याशिवाय महाराष्ट्राबाहेरच्या स्पर्धकांना ऑनलाइन साय-फाय करंडक स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. त्यासाठी त्यांना सोशल मीडीयावर नोंदणी करता येणार आहे. ऑनलाइन स्पर्धेसाठी सहभागी होऊ इच्छिणाऱ्या संघांनी त्यांच्या एकांकिका सोशल मीडियावर अपलोड करणे बंधनकारक आहे. शिवाय अपलोड केलेल्या एकांकिकेची लिंक info@cyfiarts.com या ईमेल आयडी वर पाठवणे आवश्यक आहे.

पुणे, मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर, गोवा आणि नागपूर या सहा केंद्रांवर सप्टेंबर महिन्यांपासून स्पर्धकांची निवड प्रक्रिया सुरू करण्यात आली असून सुमारे १०० संघांमधून २८ संघांची निवड अंतिम स्पर्धेसाठी करण्यात आली आहे.